# Electronic International Interdisciplinary Research Journal ( EIIRJ )

**Impact Factor : 0.987**

**ISSN : 2277-8721**








***Reviewed Online Journal***
***(Bi-Monthly)***
***Mar-April ISSUES***

**Chief-Editor:**

**Ubale Amol Baban**

www.aarhat.com

INDEX COPERNICUS INTERNATIONAL

CiteFactor
Academic Scientific Journals

2015

ISSN 2277- 8 7 2 1
Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Bi-monthly Reviewed Journal Mar- April 2015

# महात्मा गांधी व शेतकरी चळवळी एक ऐतिहासीक अध्ययन

**श्री.राजु दिगंबर कुटे**

पांगरी कुटे

जि.वाशिम

प्रस्तावना :—

प्राचीन काळापासुन भारत कृषिप्रधान देश म्हणुन ओळखला जातो. भारतीय लोकसंख्या ही जास्तीत जास्त शेती वर अवलंबुन आहे. ग्रामीण भारतावर ब्रिटीश सत्तेचा पडलेला महत्वाचा प्रभाव म्हणजे भारतीय कृषि व्यवस्थेत झालेले दुरगामी बदल होत. ब्रिटीश सरकारच्या भू—धारणामुळे नविन प्रकारचे भूस्वामी निर्माण झाले. ग्रामिण भागातील उदारनिर्वाहाची साधने कमी असल्याने भारतीय भुमिवरील बोझा वाढला. यामध्ये ब्रिटीश सरकार व जमिनदाराच्या कचाट्यामध्ये शेतकरी वर्ग भरडला जावुन शेतकरी वर्गाला अधिकाधिक दारिद्रयात ढकलले. यातच भरीत भर म्हणजे भारतात वारंवार पडणारे दुष्काळ यात सर्वसामान्य शेतकरी वर्ग होरपळुन त्यात उपासमारीने लक्षवधी शेतकरी वर्ग व इतर दुर्बल घटक मृत्यूमुखी पडले. ब्रिटीश सरकारच्या भुमिकर धोरणाचे परिणाम म्हणुन अनेक वेळा दुष्काळाला शेतकरीवर्गाला समोरे जावे लागले. दुष्काळ व वस्तुच्या टंचाई मुळे ग्रामीण भागातील शांतता व सुव्यवस्थिती इतकी बिघडली की, ग्रामीण धनीकच नव्हे तर प्रशासकाच्या ही हृदयाचा थरकाप उडाला. यामध्ये ब्रिटीश सरकारचा दुष्काळ पिडीताविषयी मदत कार्याचा उद्देश सहानुभुती नसुन उत्पनाच्या स्त्रोत्राचे रक्षण करणे व प्रचलित व्यवस्थेला कोणताही धोका निर्माण होउ न देणे हाच होता.

ब्रिटीशांच्या अत्याचारीक धोरणांचा परिणाम होवुन शेतक—यांच्या मनात असंतोष्याचे बीज रोवल्या गेले. हा असंतोष चळवळीच्या रूपाने प्रगट झाला. शेतक—यांचा असंतोष हा विरोध, बंडे ईत्यादी रूपाने प्रगट होवुन त्यातुन सरजामशाहिचे जोखड फेकुन देणे हाच मुख्य उद्देश होता. १९व्या शतकात शेतक—यांचा संतोष प्रगट होवु लागला. शेतक—यांच्या अनेक मागण्या असुनही त्यांची व्यवस्थित संघटना नसल्याने शेतकरी बंडाने राजकीय रूप धारण केले नाही. परंतु २०व्या शतकात शेतकरी ख—या अर्थाने जागा होवुन त्यानी अन्याय अत्याचाराविरूद्ध प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये अनेक संघटना निर्मान होवुन त्यात शेतकरी बंडाचे स्वरूप प्राप्त झाले. यामध्ये संथाळाचे बंड १८५५—५६ हा शेतकरी चळवळीचा किंवा बंडाचा ख—या

अर्थाने पाया मानला जातो. संथांळांनी जमिनदार व ब्रिटीश सरकार यांच्या विरूध्द संघटित होवुन न्याय मिळविण्याचा पहिला प्रयत्न केला. परंतु ब्रिटीश सरकार व जमिनदारांनी अतिशय क्रुरपणे हे बंड दडपुन टाकले. परंतु संथांळांच्या या बंडाची दखल ब्रिटीश सरकारला घ्यावीच लागली.

१८५७च्या उठावातील शेतकरी वर्गाची भुमिका कोणत्या प्रकारची होती या उठावात शेतक—यांचा सावत्रिक सहभाग दिसत नसला तरी शेतकरी वर्गाने जमिनदाराचे अत्याचार विसरून परकिय सत्ता उखळुन फेकण्यासाठी प्रयत्न केले. परंतु १८५७च्या उठावानंतर इंग्रज सरकारने पुन्हा जमिनदाराकडे मोर्चा वळुन शेतक—यांच्या न्याय हक्काकडे दुर्लक्ष केले. आणि शेतक—यावर उठावाची भाग घेतल्याची शिक्षा म्हणुन अत्यंत कर लादण्यात आले.

१८८५ मध्ये राष्ट्रिय सभा स्थापन करण्यात आली. कॉंग्रेसच्या सुरवातीच्या काळात कॉग्रस ही ब्रिटीश सरकार व जमिनदार मध्यम वर्ग यांचे मिश्रण असल्यामुळे पिडीत शेतकरी वर्गांची बाजु उचलुन धरतील असी कॉंग्रेसची अवस्था नव्हती अनेक कॉग्रसच्या अधिवेशनात शेतकरी वर्गाविषयी व त्यांच्या समस्येविषयी त्यावर ठोस स्वरूपाची उपाययोजना नव्हती. कॉग्रसने आपल्या मागण्यामध्ये भुमिकर कमी करणे, मिठावरील कर हटविणे, प्रशासनात भारतीयांची भरती करणे. इत्यादी अनेक मागण्या होत्या या मागण्यांना केराची टोपली दाखवली.

**महात्मा गांधी व शेतकरी चळवळी** :—

महात्मा गांधी यांनी भारतीय राजकारणात पदार्पण केल्यामुळे देशाला एक नवी आर्थिक व राजकीय दिशा मिळाली. महात्मा गांधी यांनी भारतात व्यापक चळवळ बनवायची असेल तर ग्रामीण जनतेला व सर्व सामान्य शेतकरी वर्गाला आपल्या चळवळीत सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला. भारतामध्ये ब्रिटीशांनी बंगाल व बिहार या प्रातांमध्ये निळ शेतीचे मळे वाढविले. व त्यात युरोपीय अधिकारी यांनी तेथील जमिनीवर ताबा मिळविला त्यावर ते निळीची शेती व्यापारी स्वरूपात करत होते. यामध्ये हे लोक शेतक—यावर अतिशय अत्याचार करीत त्यांना जबरदस्तिने निळ उत्पादन करण्यास भाग पाडत याविरूद्ध शेतक—यांनी भारताच्या इतिहासातील पहिला शेतकरी हरताळ केला. व निळ उत्पादनास विरोध केला. शेतक—यांची एकी व विरोध पाहुन ब्रिटीश

सरकारने शेतक—यांच्या हिताचे रक्षण केले जाईल व ज्याला वाटेल ते उत्पादन करण्याची मुभा दिली गेली.

**निळ उत्पादक शेतकरी व महात्मा गांधी:—**

बंगाल प्रांताप्रमाणे उत्तर बिहारच्या चंपारण जिल्हातील युरोपीय निळ उत्पादक बिहारी शेतक—यावर अन्याय अत्याचार करत होते. ज्यावेळेस महात्मा गांधीना या प्रकारची सत्यता कळल्यानंतर महात्मा गांधीनी राजेंद्र प्रसादाच्या मदतीने त्यांनी शेतक—यांना अहिंसक चळवळ करण्याची प्रेरणा दिली. त्यावर संतप्त होवुन ब्रिटीश सरकारने महात्मा गांधीना अटक करून चौकशी समिती नियुक्ति केली. त्यानंतर सरकारने चंपारण कृषि कायदा संम्मत करण्यात आला. त्यानुसार निळ उत्पादक शेतक—यावर निळ मळे मालक लावत असलेले जास्तीचे कर बंद करण्यात आले. महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली शेतकरी चळवळीचा पहिला शेतकरी अहिंसक लढा यशस्वी झाला.

**खेडा चळवळ व महात्मा गांधी :—**

खेडा शेतकरी चळवळ ही मुंबई सरकार विरूद्ध होती १९१८मध्ये या भागातील संपुर्ण पिके नष्ट झाली होती. व दुष्काळामुळे शेतक—यांचे आतोनात नुकसान झाले होते. त्यातच ब्रिटीश सरकारकडुन जास्त भुमी कराची मागणी व्हावी परंतु भुमी कायद्यात २५: उत्पन्न कमी असल्यास भुमीकरात पुर्णता सुट दिली जाईल परंतु ब्रिटीश सरकारचा अशी सुट देण्यास तयार नव्हते. म्हणुन महात्मा गांधी यांनी खेडा विभागातील सर्व सामान्य शेतकरी वर्गाला संघटित केले व त्यातुन सर्वच वर्गाच्या लोकांचे समर्थन मिळवले. या सत्याग्रहात प्रचंड संख्येने शेतक—यांना न्याय हक्कासाठी सत्याग्रह केला. व ते तुरूंगात गेले अखेर सरकारला महात्मा गांधीजींच्या शेतक—यांच्या मागण्या सम्मत कराव्या लागल्या या चळवळीने महात्मा गांधी यांना राष्ट्रिय नेता बनविले व त्यातुन संघटित होवुन कार्य केल्यास यश मिळते. असा आत्मविश्वास शेतक—यामध्ये निर्माण झाला.

**१९३६ चे फैजपुर अधिवेशन व महात्मा गांधी :—**

शेतकरी वर्गाच्या किसान सभा स्थपन होवुन त्यात अनेक मागण्या करण्यात आल्या होत्र्या. त्यामुळे किसान सभाच्या स्थपनेमुळे व कार्यमुळे

कॉग्रेसवर दबाव वाढला त्यातुन महात्मा गांधी यांनी पंडित नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील ग्रामीण भागात असलेले शेतक—यांसाठी असलेले पहिले अधिवेशन भरवीले कॉग्रसने आपल्या कृषि विषयक कार्यक्रमात बदल करण्याचे ठरविण्यात आले. भारतासाठी एक कृषि कार्यक्रम तयार करण्यात येवुन त्यात दारिद्र, बेकारी, शेतक—यांचे मागासले पण याकडे लक्ष वेधण्यात आले. ज्यात भुमिकर, सिंचाई व कालवे यांचे दर कमी असावे, कृषि कर्जातुन सुटका शेत मजुरांना पुरेसे वेतन किसान संघटनांना मान्यता ई. अनेक गोष्टिंचा अंर्तभाव केला गेला.

**सविनय कायदेभंग चळवळ व शेतकरी** :—

महात्मा गांधी यांनी संपुर्ण भारतात सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. त्यात सर्व सामान्य वस्तु मिठाचा कायदा मोडुन सविनय कायदेभंगाचा श्री गणेशा करून त्यातुन देशामध्ये सविनय कायदेभंग चळवळिस प्रेरणा मिळाली. त्यात सर्वसामान्य अशा शेतकरी वर्गाला समाविषठ करून घेतले. या चळवळीत सर्व सामान्य शेतकरी वर्गाने सहभाग घेवुन महात्मा गांधीजींच्या अहिंसक आदोलनांत प्रत्यक्ष सहभाग घेतला. महात्मा गांधी यांनी भारताला स्वातंत्र मिळवायचे असेल तर शेतकरी वर्गाला त्यात सामिल करून घ्यावे लागले. यासाठी त्यांनी स्वदेशी माल वापरणे, परकिय मालावर बहिष्कार टाकणे याचा उद्देश भारतीय शेती व उदयोग धंद्याची भर भराट व्हावी त्यांचा आर्थिक दर्जा उंचवावा. स्वदेशी चळवळ ही राजकीय, आर्थिक व सामाजिक स्वरूपाची नव्हती. तर ती एक शेतकरी व सर्व सामान्य, सर्व समावेशक चळवळ होती असे दिसुन येते.

**संदर्भ ग्रंथ:—**

०१.बी.एल.ग्रोवर व एन.के.बेल्हेकर आधुनिक भारताचा इतिहास प्रकाशक :— एस.चंद्र

०२. गोविंद सखाराम सरदेसाई ब्रिटीश रियासत

०३.डॉ.हुकुमचंद्र जैन आधुनिक भारताचा इतिहास प्रकाशक :—के.सागर पब्लि.